लोकमत

### सुधीर गोगटे : जागतिक व्यापार दिनानिमित्त चर्चासत्र; जागतिक व्यापार केंद्र, सॅटर्डे ग्लोबल ट्रस्टतर्फे आयोजन

# निर्यातीच्या संधी साधा; गुणवत्तेमध्ये तडजोड नको

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : औद्योगिक उत्पादनाची गुणवत्ता, दर्जा चांगला असेल, तर निर्यातीच्या क्षेत्रात प्रचंड संधी आहेत. या संधी साधण्यासाठी गुणवत्तेमध्ये तडजोड करू नका, असे आवाहन 'किहिन फाई'चे कार्यकारी संचालक सुधीर गोगटे यांनी मंगळवारी येथे केले.

जागतिक व्यापार दिनानिमित्त सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगातील (एमएसएमई) स्पर्धात्मकता आणि निर्यात वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने जागतिक व्यापार केंद्र (मुंबई) आणि सॅटर्डे ग्लोबल ट्रस्टतर्फे आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. रेसिडेन्सी क्लबमधील या चर्चासत्रास कोल्हापूर जिल्हा उद्योग केंद्राचे सरव्यवस्थापक एस. डी. शेळके, इंजिनिअर एक्सपोर्ट प्रोमोशन कौन्सिलचे सहायक संचालक मुकेश समतानी, पुणे येथील सनी गर्ग, बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे, कन्वर्जन इंटरनॅशनलचे मुख्य कार्यकारी अधिकारी के. के. बिरनाळे प्रमुख उपस्थित होते. सुधीर गोगटे म्हणाले, गुणवत्ता, किंमत, वितरण, विकासाची पावले आणि व्यवस्थापन यांची योग्य सांगड निर्यात वाढीसाठी महत्त्वाची आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन प्रमुख उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्रतापसिंग भद्रा, 'सॅटर्डे क्लब'चे विभागीय सचिव हर्षवर्धन भुरके, मनोज गुणे, जयेश पाटील, सारिका बकरे, आशा माळी, अजित तांबेकर, आदी उपस्थित होते. वर्ल्ड ट्रेड सेंटरचे सहसंचालक अनिल वेलदे यांनी स्वागत केले. मनीषा पाटील, शुभदा हिरेमठ यांनी सूत्रसंचालन केले. 'सॅटर्डे क्लब'चे मिलिंद पाटील यांनी आभार मानले.

दीपक जाधव




कोल्हापुरात मंगळवारी जागतिक व्यापार केंद्र (मुंबई) आणि सॅटर्डे ग्लोबल ट्रस्टतर्फे आयोजित चर्चासत्राचे उद्घाटन जिल्हा उद्योग केंद्राचे सरव्यवस्थापक एस. डी. शेळके यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी अनिल वेलदे, नितीन देशपांडे, सुधीर गोगटे, मुकेश समतानी, सनी गर्ग, आदी उपस्थित होते.

## कोल्हापुरात ३० टक्के खर्च

क्लस्टरचे सर्वात जास्त प्रकल्प कोल्हापूरमध्ये आहेत. या जिल्ह्यातील उद्योगवाढीचा वेग अधिक आहे. सन २००५ मध्ये येथे सहा हजार उद्योगांची संख्या होती. सध्या ती ४० हजारांवर पोहोचली आहे. उद्योगाच्या एकूण बजेटपैकी ३० टक्के खर्च कोल्हापुरात होतो, असे एस. डी. शेळके यांनी यावेळी सांगितले.